**CNR No. MHWR030009882022**
**नि. फौ. ख. क्र. १४२/२०२२**
**सरकार / प्रमोद**
**<u>नि.क्र. २२</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची शपथेवर साक्ष**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की —

माझे नाव : राजीव अरविंद रामटेके,

वय : ३९ वर्षे, व्यवसाय : वैद्यकीय अधिकारी, नागपुर.
रा. : कामठी रोड, नागपुर, ता. जि. नागपुर.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एस. पठाण मार्फत</u>**

१. माझे एमबीबीएस एम.डी. पॅथॉलॉजी चे शिक्षण पुर्ण झालेले आहे. मी दि. ०२/०१/२०२२ रोजी सामान्य रूग्णालय, वर्धा, येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत होतो.

२. मी त्यादिवशी कॅज्युयल्टी विभागात आपातकालीन विभागामध्ये कार्यरत होतो. त्यावेळी पो.शि. श्री. महेश, ब.नं. १४६१ हे माझेकडे रात्री ९ वाजताचे सुमारास तहरीरसोबत रूग्ण नामे अविनाश धर्मपाल रामटेके याला तपाणीकरीता घेवून आले होते. मी सदर रूग्णाची वैद्यकीय तपासणी केली तेव्हा मला त्याचे शरीरावर एकूण ०२ जखमा आढळल्या होत्या.

३. त्यापैकी पहिली जखम incise wound of length 4 X 0.5 c.m. on left arm pit अशी आढळली होती. ती साध्या स्वरूपाची व ताजी जखम होती. तसेच ती एका धारदार शस्त्राने झाली असावी. दुसरी जखम abbrasion of 3 X 3 c.m. on right elbow अशी आढळली होती. ती सुध्दा ताजी व साध्या स्वरूपाची होती. तसेच ती एका टणक व बोथट वस्तुने झाली असावी. त्यामुळे मी त्याचेवर उपचार करून पुढील तपासणीकरीता त्याला सर्जरी विभागाकडे पाठविले होते.

४. सदर रूग्णाचे डावे खांद्यावर एम किंवा हार्ट सारखे गोंदलेले होते. सदर रूग्णाचा मी तपासणी केलेला वैद्यकीय अहवाल अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. २३** देण्यात येते. तसेच त्याचा इन्ज्युरी रिपोर्ट सुध्दा अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. २४** देण्यात येते.

५.        त्यानंतर दि. १७/०१/२०२२ रोजी पो.शि. श्री. शैलेश चाफलेकर, ब.नं. ६३० हे नि.क्र. २० वरील तहरीरसह क्युरी करीता एक शस्त्र घेवून आले होते. त्यांनी माझेकडे एक धारदार लोखंडी चाकु आणला होता. तो १५ सें.मी लांब व २ सें.मी. रूंदीचा चाकु होता. मी सदर शस्त्राची पाहणी करून त्याबाबत क्युरी अहवाल दिला होता. ते अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. २५** देण्यात येते.

६.        सदर अहवालानुसार रूग्णाला झालेली पहिली जखम ही त्या चाकु या शस्त्राने होवू शकते. मी सदर क्युरी केलेल्या चाकु बघितल्यावर ओळखू शकतो. न्यायालयात दाखल एम.ओ. क्र. १ वरील चाकु तोच आहे. त्यावर माझे सहीचे लेबल सुध्दा आहे. सदर जखम या चाकुने होवू शकते.

**सर तपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एम. डब्ल्यु. बेग मार्फत</u>**

७.        हे म्हणणे खरे आहे की, रूग्णाला झालेली पहिली जखम तो एखाद्या धारदार वस्तुवर पडल्याने होवू शकते. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या इसम नाली सारख्या ठिकाणी पडल्यास त्याला एका बाजुला पहिल्या जखमेसारखी इजा व दुस—या बाजुला खरचटू शकते. मी सदर रूग्णाचे ओळखपत्र बघितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस शिपायाने सादर केलेल्या तहरीरमध्ये जे नाव नमुद होते तेच नाव मी वैद्यकीय अहवालावर लिहिले होते. मी सदर रूग्ण मद्याच्या अमंलाखाली आहे किंवा नाही याबाबत तपासणी केली नव्हती.

८.        माझेकडे सादर केलेल्या चाकुवर रक्ताचे कोणतेही डाग नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांचे सांगण्यावरून खोटे वैद्यकीय दाखले तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांचे सांगण्यावरून आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.                                                  माझे समक्ष,

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.07 16:30:56 +0530

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा.                                    ( वि. प्र. खंदारे )
दिनांक : ०७/०७/२०२६                                    न्यायदंडाधिकारी, प्र. व., वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १ )

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष आरोपी व त्यांचे विद्वान वकिलांचे समक्ष नोंदविण्यात आली आणि आरोपींना सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात आली.

आरोपीची सही

...................

( वि. प्र. खंदारे )
न्यायदंडाधिकारी, प्र. व., वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १ )

दिनांक : ०७/०७/२०२६